शे.का.मु.-४०,००० पु. (२१ x ६) -०८-२०१०-९ ३-वि (वाय) ३५६

FORM - 1A | N.C.R.B. I.I.F.-I | 06

# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र जिल्हा District मुंबई पोलीस ठाणे Police Station लाप्रवि पहिली खबर क्र. FIR No. १२/१८ वर्ष Year २०१८ दिनांक Date १९/३/२०१८

2. (i) अधिनियम Act .......... कलमे Sections ..........
(ii) अधिनियम Act .......... कलमे Sections ७,१२,१३(१)(ड) सह १३(२)
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections भ्र.प्र.अ. १९८८

3. (a) अपराधाची घटना : वार शनिवार तारीख पासून १७/३/१८ वेळ २२.०० तारीख पर्यंत १९/३/१८ वेळ १९.००
Occurence of offence : Day Date from Time Date to Time

3. वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी अशी खूण करा. Tick applicable portion)
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00

(b) पो. ठा. ला माहिती मिळालेची Information received at P. S. तारीख Date १९/३/१८ वेळ Time १४-३०

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ४/१८ तारीख Date 20/03/2018 वेळ Time 06.20 वा.

4. माहितीचा प्रकार Type of information : लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा .......... चौकी/बीट/दूरक्षेत्र नाव व क्र. ..........
Place of Occurence : (a) Direction and distance from P.S. Chouki/Beat/O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurence Name माहिम पो.ठाणे ठिकाणाचे नंबर No. if any .......... गल्ली Ward .......... रस्त्याचे नाव Name of road मगदुम शहा गल्ली
जवळचे ओळख चिन्ह/ठिकाण Nearest Adentifiable Place .......... गाव Village .......... पोस्ट Post .......... तालुका Taluka .......... जिल्हा Dist. मुंबई राज्य State महाराष्ट्र
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station .......... तालुका Taluka .......... जिल्हा Dist. .......... राज्य State ..........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant/Informant : Permanent Address
(a) नाव Name रमाशंकर यादव (b) वडिलाचे / पतीचे नाव Father's / Husbands Name रामगोपाल यादव
(c) जन्मतारीख व वय Date of Birth & Age .......... (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ..........
(e) पारपत्र क्रमांक Passport No. .......... दिल्याचा दिनांक Date of Issue .......... दिल्याचे ठिकाण Place of Issue .......... (f) व्यवसाय Occupation हॉटेल व्यवसाय
(g) धर्म Religion .......... जात Caste .......... जनजात Sub-Caste ..........
(h) पत्ता : गल्ली/सर्व्हे नं. Address : Ward ए/०४ घर/नाव नंबर House/Name No. शिवसागर सोसायटी फोन/मो. नंबर Phone/M. No. .......... पॅन नं. Pan No. .......... ओटर्स नं. Card No. रॉयल हॉटेल
रस्त्याचे नाव Road ल.जे.रोड जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place माहिम गाव Village .......... पोस्ट Post .......... पो.स्टे P. Stn. माहिम पो.स्टेशन
तालुका Taluka मुंबई जिल्हा Dist. मुंबई राज्य State महाराष्ट्र सध्याचा पत्ता Present Address ..........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म I B वर वेगळ्या सिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व स. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे).
Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary) (If suspect particular of physical feature write on Form I-B of attach FIR I-B to case diary).

१) व.पो.नि. मिलींद लालोबा इडेकर } माहिम पो.ठाणे
२) पो.ना.क्र. ९९०४४९/रमेश साबाजी तेली

~~सदरचा जबाब हा प्रथम खबर म्हणुन~~

फिर्यादी रमाशंकर रामगोपाल यादव यांची फिर्याद स्वतंत्र कागदावर टंकलिखीत केली असुन ती गुन्ह्याची प्रथम खबर म्हणुन संबोधण्यात यावी.

समक्ष

(राजेंद्र ठाकरे)
सहाय्यक पोलीस आयुक्त
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

फिर्यादी जबाब                                    दिनांक १९/०३/२०१८

श्री. रमाशंकर रामगोपाल यादव, वय ३९वर्षे, व्यवसाय —व्यवस्थापक/चालक, रॉयल ऑर्केस्ट्रा बार व रेस्टॉरंट, माहिम वेस्ट, मुंबईरा.ठि. अे/४, शिवसागर सोसायटी, एल.जे.रोड, माहिम (पश्चिम), मुंबई — ४०००१६,मो.नं. ९३२१९८९७८९.

मी वरील प्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर माझे कुटुंबियासह लहानपणापासूनरहावयास आहे. मी माहिम पोलीस ठाणे हद्दीत रॉयल ऑर्केस्ट्राबार व रेस्टॉरंट ची व्यवस्थापक/चालक म्हणुन काम पहात आहे. सदरचाऑर्केस्ट्राबार व रेस्टॉरंटकायदेशीरबाबीची पुर्तता करून मी चालवितो.

दिनांक १७/०३/२०१८ रोजी रात्री ११.०० चे दरम्यान माझ्या रेस्टॉरंट व ऑर्केस्ट्राबारमध्ये८ ते १० ग्राहक बसून आर्केस्ट्राचे गाणे ऐकत होते. त्यादरम्यान माहिम पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. मिलींद इडेकर व त्यांचे सोबत माहिम पोलीस स्टेशनचे अधिकारीव ८ ते १० अंमलदार आले. त्यावेळी मी व.पो.नि. श्री. इडेकर साहेबाना भेटून काय झाले याबाबत विचारणा केली असता, तुम्ही कायदयाचे उल्लंघन केले असे त्यांनी सांगितले. त्यावेळी मी कोणतेही बेकायदेशीर काम केले नसुन आस्थापनेच्या कायदेशीर अटी व शर्ती नुसार हॉटेल चालवित आहे. तेव्हा श्री. इडेकर साहेब म्हणाले की, '' मुझे कानून मत सिकाव। मै ऐसा बडा केस करूगा की तुम्हारा बार बंद हो जाएगा और तुम लोगो को जमानत तक नही होगी।'' त्यावेळी मी श्री. इडेकर साहेबाना सांगितले मी कायदयाचे उल्लंघन केलेले नाही. तुम्ही माझ्या हॉटेलचे सी.सी.टी.व्ही. चे रेकॉर्ड तपासून पहा. तेव्हा वपोनि इडेकर साहेबानी मला सांगू नको असे सांगितले. आज कालचा ''मोहौल बहुत खराब है।'' मी छोटी मोठी केस करून सोडून देतो, मोठी कारवाई करावयाची नसल्यासमाझेकडेरु. ५०.०००/— रक्कमेची मागणी केली.

त्यावेळी बारचे मॅनेजर श्री मुंकूंद तमयाचार आचार्य याना पोलीस ठाणेस नेवूनमाझ्या बार व रेन्टारंट विरूध्द महाराष्ट्र पोलीस कायदा कलम २१९ रुल. १/३३ डब्लू/१३९ व कलम २०४, रुल न.१/३३ एक्स/१३१/मुपोका अन्वये स्था.गु.नो.क्र. २९३/१८ व स्था.गु. नो.क्र. २९४/१८ अन्वयेकारवाई करुन अनामत रक्कम म्हणुन प्रत्येकी रू. १२,५००/—अन्वये आस्थापनेचे मॅनेजर श्री मुकूंद तमयाचार आचार्य यांचे विरुध्द कारवाई करण्यात आली. त्यावेळी मी पोलीस ठाणेस येवुन अनामत रक्कम म्हणुन रू. २५,०००/— जमा केली व मला त्याची पावती देण्यात आली.

दि. १८/०३/१८ रोजी वपोनि ईडेकर साहेबाचे मदतनीस तेली याना मोबाईलवर संपर्क साधला असता, माझे कोर्टाचे कागदपत्राबाबत विचारणा केली त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, सकाळी कोर्टात जावुन ये असे सांगितले.

त्यानंतर मॅनेजर आचार्य हे दि.१९/०३/१८ रोजी सकाळी मॉर्निग कोर्टात गेले परंतु त्याना कोर्टाचे कोणतेही कागदपत्र देण्यात आले नाही. म्हणुन वपोनि यांचे ऑर्डली तेली यानी फोन वरुन सायंकाळी पोलीस ठाण्यास येवून वपोनि ईडेकर साहेबाना भेटण्यास सांगितले.

समक्ष

(राजेंद्र ठाकरे)
सहाय्यक पोलीस आयुक्त
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

आज रोजी दि. १९/०३/१८ रोजी वपोनि ईडेकर यांचे ऑर्डली याना मोबाईलवर संपर्क साधला असता ऑर्डली तेली यानी मला सांगितले की, साहेब पोलीस ठाणेस असुन मला बोलविले आहे. वपोनि ईडेकर यानी माझेकडे ५०,०००/— रक्कमेची लाचेची मागणी दि.१७/०३/१८ रोजी केली होती परंतु मला लाच देण्याची इच्छा नसल्याने मी अँन्टी करप्शन ब्युरो, वरळी, मुंबईयेथे तक्रार देण्याचे ठरविले. त्या अनुषंगाने मी दि.१९/०३/१८ रोजी अँन्टी करप्शन ब्युरो वरळी मुंबई येथील कार्यालयात तक्रार देण्यासाठी आलो. अँन्टी करप्शन ब्युरो कायालर्यात आल्यावर माझी सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. ठाकरे यांच्याशी ओळख करून देण्यात आली. त्यावेळी मी त्यांना माझ्या स्व:हस्ताक्षरात अर्ज दिला. सपोआ. ठाकरे यांनी मला, मी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दोन शासकिय पंचासमक्ष पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यान लोकसेवक यांनी लाचेची मागणी केल्याचे निषन्न झाल्यावरच सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येईल असे सांगितले.

त्यानंतर सपोआ ठाकरे यांच्या सुचनेप्रमाणे व ठरल्याप्रमाणे आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी कार्यालयातून निघून माहिम पोलीस ठाणे येथे सापळा पथकासह आलो. काही वेळानंतर माझ्या शर्टाच्या आतील बनियनला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावुन पडताळणी करण्याकरीता एका पंचासह लोकसेवकाची भेट घेण्याकरीता पाठविले. त्याप्रमाणे मी माहिम पोलीस ठाणे येथील वपोनि कक्षामध्ये वपोनि इडेकर यांना भेटलो. त्यावेळेस त्यांनी मी चालवत असलेल्या बारवर मोठी कारवाई न करण्याकरीता रू. ५०,०००/— ची लाचेची मागणी केली होती व सदरची रक्कम तात्काळ घेवून येण्यास सांगितले. त्यावेळी तडजोडीअंती रू.४०,०००/— स्विकारण्याचे कबुल केले व पहिला हप्ता म्हणून रू. २०,०००/— त्यांचेऑर्डली तेली यांना देण्याबाबत सांगितले.

त्यानंतर सपोआ ठाकरे व पोनि डिमेलो यांना सदरबाबतची माहिती सांगितली व डिजीटल व्हाईस रेकॉर्डरवर झालेले संभाषण सपोआ ठाकरे यांनी पंचांसमक्ष ऐकले. लोकसेवकाकडून लाचेची स्पष्ट मागणी झाल्याने सपोआ ठाकरे यांनी सापळा कारवाईचे आयोजन केले व मला, सापळा पथक व पंचास सापळा कारवाईच्या दरम्यान घेण्यात येणाऱ्या दक्षतेबाबत योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर सपोआ ठाकरे यांनी मला प्रत्यक्ष जावुन लोकसेवक श्री. इडेकर यांना भेटावयास सांगितले. त्यानंतर मी माझ्या बचतीमधील रुपये २०,०००/— इतकी रक्कम लाच म्हणुन वापरण्यात येणार असल्याने सदरच्या रु. २००० रक्कमेच्या १० चलनी नोटा सपोआ ठाकरे यांना दिल्या. त्यानंतर सपोआ ठाकरे यांनी सापळा पथकातील अंमलदाराकरवी कोऱ्या कागदावर नोटाचे नंबर लिहून सपोआ ठाकरे व पंचाच्या सहयाघेण्यात आल्या.

त्यानंतर लोकसेवक वपोनि इडेकर यांनी लाचेची रक्कम स्विकारली तर फिर्यादीने कार्यालयाच्या बाहेर येवून वारंवार डोक्यावरून हात फिरवायचा तसेच ऑर्डलीने लाचेची रक्कम स्विकारली तर फिर्यादीने कार्यालयाच्या बाहेर येवून चेहऱ्यावरून वारंवार हात फिरवायचा असा इशारा देण्यात आला.

त्यानंतर सपोआ ठाकरे यांच्या सुचनेवरून पो.ह.क्र.२९७२६/मोरे यांनी मला व पंचाना (खाजगी वाहन. एम.एच.०१ ए.एक्स. ३४३४ टाटा सफारी) अँन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगितले व वेळे अभावी नंतर प्रात्यक्षिक करून दाखविण्यात येईल असे सांगून, पंचांसमक्ष मी दिलेल्या रुपये २०,०००/— किमतीच्या(रू.२,०००/— च्या १०)चलनी नोटांना

समक्ष

(राजेंद्र ठाकरे)
सहाय्यक पोलीस आयुक्त
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

अॅन्थ्रासिन पावडर लावली व सदर रक्कम पो.ह. मोरे यांनी मी परिधान केलेल्या शर्टच्या डाव्या खिश्यात ठेवली. त्यानंतर सपोआ ठाकरे यांच्या सुचनेप्रमाणे सापळा कारवाईकरीता पुन:श्च माझ्या शर्टाच्या आतील बनियनला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून लावण्यात आला. त्यानंतर मी वपोनि श्री. मिलींद इडेकर यांची भेट घेण्याकरीता माहीम पोलीस ठाणेच्या दिशेने निघालो. माझ्या मागोमाग पंच व सापळा पथकातील पोलीस अंमलदार हे कोणासही संशय येणार नाही अशा स्थितीत माहीम पोलीस ठाणे येथे गेलो तेव्हा वपोनि श्री. इडेकर साहेबाचे ऑर्डली श्री रमेश तेली यांच्याकडे साहेबाबाबत विचारणा केली असता ऑर्डली तेली यानी सांगितले की, साहेब वॉशरुम मध्ये तोड धुवत असुन साहेबानी माझेकडे पैसे देण्यास सांगितले आहे. त्यावर मी लाचेची रक्कम ऑर्डली तेली यांचेकडे रू. २०,०००/—देण्याकरीता हात पुढे केला असता,मी माझ्या उजव्या हाताने माझ्या शर्टच्या डाव्या खिशातील लाचेची रक्कम काढुन वपोनि ईडेकर यांचे ऑर्डली तेली यांच्या हातात दिली त्यावेळी ऑर्डली तेली यांनी सदरची लाचेची रक्कम रू. २०,०००/— स्विकारून स्वत:च्या पॅटच्या डाव्या खिशात ठेवली. त्यावेळी ऑर्डली तेली यानी " कितना है, " अशी विचारणा केली असता, मी त्यासवीस हजार असल्याचे सांगितले. त्यांनी बाकी रक्कमेबाबत विचारणा केली असता नंतर देतो असे सांगितले.

ऑर्डली तेली यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर ठरलेला पुर्व नियोजीत इशारा म्हणुन मी माझ्या चेहऱ्यावरून वारंवार हात फिरवला व माझा पुर्व नियोजीत इशारा ओळखताच जवळच असलेल्या पोलीस पथकाने वपोनि यांचे ऑर्डली तेली याना ताब्यात घेतले व वपोनि मिलींद इडेकर हे वपोनि कक्षाच्या पाठीमागील बाथरुमच्या बाजुस उभे असताना सापळा पथकातील अधिकारी यानी त्यांचे दोन्ही हात पकडुन अटकाव केला.

वपोनि मिलींद तातोबा इडेकर, व ऑर्डली पो.ना.क्र.९६०४९/तेली माहीम पोलीस ठाणे मुंबई यांच्याशी माझे कोणतेही पूर्ववैमनस्य नाही किंवा माझे त्यांचेशी कोणत्याही प्रकारचे आर्थिक देण्याघेण्याचे व्यवहार नाहीत. वपोनिइडेकर यांचे वतीने ऑर्डली तेली यांना देण्याकरीता आणलेली लाचेची रक्कम ही मी माझ्या बचतीतुन आणलेली आहे. तरी लोकसेवक मिलींद इडेकर, वपोनि माहिम पो. ठाणे यांनी माझ्या बारवर मोठी कारवाई न करण्याकरीता रू. ५०,०००/— ची लाचेची मागणी केली होती व सदरची रक्कम तात्काळ घेवून येण्यास सांगितले. त्यावेळी तडजोडीअंती रू.४०,०००/— स्विकारण्याचे कबुल केले व पहिला हप्ता म्हणून रू. २०,०००/— त्यांचे ऑर्डली तेली यांनी लाचेची रक्कम स्विकारली म्हणुन माझी त्यांचे विरोधात कायदेशीर फिर्याद असुन कारवाई होण्यास विनंती आहे.

माझा जबाब मराठीत संगणकावर टंकलेखीत करुन तो मला वाचुन हिंदीतुन समजावुन सांगितला असता तो मी सांगितल्या प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

**( राजेंद्र ठाकरे )**
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

76

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे पडताळणी नंतर लगेच

Records for delay in reporting by the Complainant/informant

9. चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मा.ामत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तार मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proform) write down details on blank back page.

—

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य —

Total value of properties stolen and involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recover Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक

Unnatural/Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील को-या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, i' required) : Detail write down back blank page.

खालील नमुद तारीख,वेळी व ठिकाणी फिर्यादी रमाशंकर यादव यांचे रॉयल ऑर्केस्ट्रा बार व रेस्टॉरंटमध्ये कायदेशीर बाबींचे उल्लंघन झाले. म्हणुन सदर हॉटेलचे मॅनेजर यांच्यावर मपोका अन्वये कारवाई करण्यात आली. आरोपी क्र.१ यांनी तक्रारदार यांच्या हॉटेल संदर्भात इतर मोठी कारवाई न करण्यासाठी रु.५०,०००/- लाचेची मागणी करुन तडजोडी अंती रु.४०,०००/- स्विकारण्याचे कबुल केले व पहिला हप्ता म्हणुन रु.२०,०००/- त्यांचे मदतनीस असलेले पो.ना. सेळी यांच्या मार्फतीने स्विकारले म्हणुन कलम ७,१२,१३(१)(ड) सह १३(२) अन्वये नोंद.

13. **केलेली कार्यवाही** .— 1. वरील फिर्यादीवरुन कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करुन तपासावर घेतला. तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण.

3. दुस-या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........ जिल्हा ........ राज्य ........

*Action taken* .— Since the above information reveals Commission of offence (s) u/s. as mentioned at Item No. 2 :

(1) Registered case and took up the investigation or Directed (Name of I. O.) .............. Rank .................. No. .............. to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ........................ (3) Transferred to P. S. ........................ District ........................ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून/वाचून/ऐकून बरोबर नोंदविली असल्याच त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

पोलीस ठाणे प्रभारी अधिका-याची सही.

Signature of Officer Incharge, Police Station.

संपूर्ण नाव Name राजेंद्र ठाकरे

पदनाम Rank ........

तपासिक अं. चा कोड क्र. सपोआ

Posting लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई

Coding No. of I. O. ........

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant/Informant

15. १. न्यायालयास सादर केल्याची तारीख ..............

1. Date and time of submitted to the Court

प्रत. 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.